

# मुंबईसाठी मेट्रो आवश्यक

## प्रकल्पाला विरोध करणाऱ्यांना कोर्टाने फटकारले

**मुंबई :** मुंबईसाठी मेट्रो आवश्यक आहे. वास्तविक, ही मेट्रो ३० वर्षांपूर्वीच मुंबईकरांच्या सेवेत यायला हवी होती. आजच्या घडीला मुंबईतील वाहतूक कोंडीचा प्रश्न अधिक जटील बनला आहे. हा प्रश्न सुटला पाहिजे. आम्हाला ही समस्या सोडवायची आहे, वाढवायची नाही, अशा शब्दांत उच्च न्यायालयाने गुरुवारी कुलाबा-सीप्झ मेट्रो ३ प्रकल्पाला विरोध करणाऱ्या स्थानिक रहिवाशी व कार्यकर्त्यांना खडे बोल सुनावले. वस्तुस्थिती विचारात घेऊन व्यावहारिक दृष्टिकोन ठेवा, असेही न्यायालयाने त्यांना या वेळी बजावले.

वांद्रे-कुर्ला संकुल स्थानकासाठी खारफुटीची १०८ झाडे तोडण्यास परवानगी द्या, अशी विनंती करत मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसीएल) उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. एमएमआरसीएलच्या या याचिकेवर गुरुवारी न्यायमूर्ती विद्यासागर कानडे आणि न्यायमूर्ती ए. एम. बदर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. उच्च



न्यायालयाने यापूर्वी खारफुटीसंदर्भात बॉम्बे एन्व्हॉयर्नमेंटल ॲक्शन ग्रुपने दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी करताना खारफुटीबाबत कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी आपली परवानगी घेण्याचे बजावले होते. गुरुवारच्या सुनावणीदरम्यान एमएमआरसीएलच्या वतीने ॲड. किरण बगालिया यांनी बाजू मांडली. बीकेसी आणि धारावी स्थानक परिसर किनारपट्टी नियमन क्षेत्र ३ च्या अखत्यारीत येत असले, तरी त्यासाठी खारफुटी तोडण्याची गरज नाही. कारण, याठिकाणी खारफुटीची झाडे नाहीत. वास्तविक, मेट्रो स्थानकांच्या बांधकामासाठी तोडण्यात येणाऱ्या झाडांच्या बदल्यात अन्यत्र झाडांची लागवड करू, अशी हमी एमएमआरसीएलने दुसऱ्या खंडपीठापुढे दिली होती. त्यानुसार आम्ही झाडांची पुनर्लागवड करणार आहोत, असे ॲड. बगालिया यांनी सांगितले. मेट्रो ३ प्रकल्पासाठी जपानकडून कर्ज घेण्यात आले असून कामाला झालेल्या विलंबामुळे प्रकल्प खर्चाचा भार वाढणार असल्याचे त्यांनी न्यायालयाला कळवले. त्यावर प्रस्तावित वृक्षतोडीवर आक्षेप नोंदवणाऱ्या याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. रॉबिन जयसिंघानी यांनी बाजू मांडली. सीआरझेड ३ मध्ये मेट्रोचे भूमिगत बांधकाम केले जाणार नसल्याचे त्यांनी सांगितले. उभय पक्षांचे युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर न्यायमूर्तीद्वयींनी मुंबईसाठी मेट्रोची गरज असल्याचे मत व्यक्त केले. तसेच स्थानिक रहिवाशी व कार्यकर्त्यांनी मेट्रोच्या विरोधात भूमिका घेण्याची गरज नाही. त्यांनी मुंबईची परिस्थिती विचारात घेतलीच पाहिजे. खरे तर मुंबईत मेट्रो ३० वर्षांपूर्वीच यायला हवी होती. तुम्ही ३० वर्षांनंतर ही सेवा सुरू करत आहात, असे न्यायमूर्ती कानडे यांनी सुनावले. या वेळी बॉम्बे एन्व्हॉयर्नमेंटल ॲक्शन ग्रुपच्या वकिलांनी एमएमआरसीएलच्या अर्जाला उत्तर देण्यासाठी अवधी मागितल्यानंतर न्यायालयाने या प्रकरणाची पुढील सुनावणी २४ जूनपर्यंत तहकूब ठेवली.